!! श्री !!


# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते


जा.क्र. : खा.का.प्र.प ३४५/१८/०६/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# संभाजीनगर विमानतळाला धर्मवीर संभाजी राजेंचे नाव द्या

## खासदार चंद्रकांत खैरे यांची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**संभाजीनगर : ( ता.१८ )** संभाजीनगरच्या विमानतळाचे धर्मवीर राजे संभाजी भोसले विमानतळ असे नाव देण्यात यावे, अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

संभाजीनगरच्या विमानतळाला आंतरराष्ट्रीय विमानतळाचा दर्जा देण्यासाठी शिवसेनेने वारंवार पाठपुरावा केला होता. आता या विमानतळाला धर्मवीर राजे संभाजी भोसले विमानतळ असे नाव देण्यात यावे अशी मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे संभाजीनगरच्या दौऱ्यावर आले असता यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन निवेदन दिले.

संभाजीनगर विमानतळाचे नामकरण धर्मवीर राजे संभाजी भोसले विमानतळ असे करण्याचा ठराव संभाजीनगर महानगरपालिकेने २४ एप्रिल २००२ रोजी बहुमताने मंजुर केला होता. तसेच हा प्रस्ताव ही मात्र तत्कालीन सरकारने या विषयी कसलीही आस्था न दाखवल्यामुळे हा प्रस्ताव तसाच धुळ खात पडून आहे. आता या आपल्या सरकारने अजिबात विलंब न लावता या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करावी असे खासदार चंद्रकांत खैरे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

प्रसिध्दी प्रमुख

गणेश वाघ / मनोज वडगावकर


कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400